# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर*

*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.*

*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९*

ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - www.jdteromumbai.com


क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१६/ १८१

दिनांक : 15 JAN 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व अशासकीय विनाअनुदानित,पदवी, पदव्युत्तर पदवी,

पदव्युत्तर पदविका संस्था

(विभाग अंतर्गत सर्व संस्था)

विषय — शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये नविन अभ्यासक्रम, प्रवेश क्षमतेतील बदल इत्यांदी प्रस्तावांच्या मान्यता प्रक्रियेबाबत

संदर्भ :- १. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.यांची जाहिरात क्र.२(३)/एनजीसी/मान्यता/२०१७/८ दि.०२.०१.२०१८

३. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.यांचे पत्र क्र. २/एनजीसी/न.प्र.ल./२०१८/०९ दि. ०२.०१.२०१८

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ वर्षाकरिता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रियेबाबतचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने दि.०१.०१.२०१८ ते दि. ३१.०१.२०१८ पर्यत सादर करण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्या अनुशंगाने संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाने संदर्भ क्र. २ च्या पत्रात दिलेल्या निर्देशानुसार ऑनलाईन पध्दतीने दि.३१.०१.२०१८ पर्यत ऑन लाईन पध्दतीने अर्ज करण्यास सूचित केलेले आहे. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी ,पदव्युत्तर /पदविकेत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या नवीन तांत्रिक संस्था /महाविद्यालये सुरु करणे विद्यमान संस्थंचे नवीन जागेत स्थलांतरण संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस अर्ज /प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी प्रस्तावांसाठी शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग टीईएम- २०१७/प्र.क्र.९४ /तांश४ दि.२३.०५.२०१७ च्या शासन निर्णया नुसार शासनाने विहीत नोदणी शुल्क भरण करुन दि.३१.०१.२०१८ पर्यत प्रस्तावाच्या प्रतिसह या कार्यालयास जामा करावे.

प्रस्ताव जमा करताना संस्थांनी तपासणी शुल्क धनाकर्षाव्दारे जमा करण्यात यावे. अशा सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की त्यांनी तपासणी शुल्क **Joint Director, Technical Education (ADM) Regional Office, Mumbai** यांच्या नावाने घनाकर्षा व्दारे जमा करावे. ज्या संस्था तपासणी शुल्क भरणार नाहीत अशा संस्थांची तपासणी केली जाणार नाही व संबंधीत संस्थांच्या प्रस्तावावर शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे शिफारस केली जाणार नाही व त्यास संबधित संस्था व ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहतील.तरी संचालनालयाने संदर्भीय पत्रामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे व विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- संदर्भ क्र.१ व २ च्या पत्राची प्रत

(प्रमोद अं.नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत — १. मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांना माहितीकरिता

विना अनुदानित तत्वावर पदवी, पदव्युत्तर पदवी/पदविका, पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या विविध प्रस्तावांकरिता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१७/प्र.क्र.९४/तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २३ मे, २०१७

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१३/ प्र.क्र.४३/तांशि-४, दिनांक २१/८/२०१३

२) शासन शुद्धीपत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१३/ प्र.क्र.४३/तांशि-४, दिनांक १४/३/२०१६

३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.२(३)/एनजीसी/ २०१७/६५, दि.१६/०१/२०१७

**<u>प्रस्तावना</u> :**

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे , सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करणे, पी.आय.ओ. व एनआरआय च्या जागा या संदर्भातील मुदतवाढीबाबत, प्रवेश क्षमता कमी करणे/ अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेचे स्थलांतर अथवा नावात बदल, परदेशी संलग्नता, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ करणे यासाठी आकारावयाचे नोंदणी शुल्क संदर्भाधीन क्र.१ अन्वये निर्धारीत करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकमध्ये १) ट्रस्ट/सोसायटी/ कंपनीच्या नावात बदल करणे २) महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट ३) संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे ४) पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट ५) मॅनेजमेंटमधील फेलोशिप प्रोग्राम या विषयांचा नव्याने समावेश करण्यात आला असून त्यासाठी सुध्दा शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. हे विचारात घेऊन उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय अधिक्रमित

करुन वर नमूद सर्व विषयांबाबत नोंदणी शुल्क व सुधारीत मुदत ठेव निश्चित करण्यासंदर्भात सर्व समावेशक शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे मान्यता प्रक्रियेच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन वर नमूद सर्व विषयांच्या प्रस्तावावरील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या स्तरावर आकारावयाचे नोंदणी शुल्क व मुदतठेव अनुक्रमे Annexure “A” व “B” नुसार निर्धारीत करण्यात येत आहे.

<u>Annexure “A”</u>

**विनाअनुदानित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी नोंदणी शुल्क**

**(रुपये)**

| अ. क्र | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहे किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई, ठाणे, नवी मुंबई | पुणे, नागपूर, औरंगाबाद,पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका क्षेत्र | उर्वरित महानगरपालिका | इतर |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | नवीन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमांची महाविद्यालये | २,२५,०००/- | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- |
| २. | नवीन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | नवीन अभियांत्रिकी /तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी / एमबीए/ एमएमएस/ एमसीए/ पीजीडीएम/ पीजीडीबीएम अभ्यासक्रमांची पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर/ पदविकोत्तर पदविका महाविद्यालये | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| ४. | सुरु असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये तथा संस्थेत प्रथम वा दुसऱ्या पाळीमध्ये अतिरिक्त / नविन अभ्यासक्रम सुरु करणे व अभ्यासक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| ५. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या इतर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव व इतर अंशकालीक पदविका वा पदविकोत्तर अभ्यासक्रम | ६०,०००/- | ४५,०००/- | ३०,०००/- | १५,०००/- |
| ६. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे तथा संस्थांचे स्थलांतरण | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये तथा संस्था बंद करणे | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ८. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांची दुसरी पाळी व अंशकालीन अभ्यासक्रम सुरु करणे. | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ९. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत पी.आय.ओ.च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| १० | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत एन.आर.आय. च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ११ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेतील मंजूर प्रवेश क्षमता कमी करणे/ अभ्यासक्रम बंद करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १३ | डयूअल पदवी / इंटिग्रेटेड कोर्सेस | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १४ | परदेशी संस्था/ विद्यापीठ यांचा सहयोग | ४,५०,०००/- | ३,००,०००/- | २,२५,०००/- | १,५०,०००/- |
| १५ | ट्रस्ट/ सोसायटी/ कंपनीच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १६ | महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| १७ | संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे | नोंदणी शुल्क आकारण्यात येऊ नये | | | |
| १८ | पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट :- नविन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांची महाविद्यालये | | | | |
| | (१) पदवी | २,२५,०००/- | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- |
| | (२) पदविका | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| | (३) पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका/ पदविकोत्तर पदविका | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| १९ | मॅनेजमेंटमधील फेलोशिप प्रोग्राम | ४,५०,०००/- | ३,००,०००/- | २,२५,०००/- | १,५०,०००/- |

## Annexure "B"

विनाअनुदानित पदवी,पदव्युत्तर पदवी, पदविका, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका
या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/ महाविद्यालयातील विविध
प्रस्तावांसाठी मुदत ठेव.

(रुपये)

| अ.क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष |
|---|---|---|---|
| १. | पदवी अभ्यासक्रमाची नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये | २२,५०,०००/- | २२,५०,०००/- |
| २. | औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये | १२,००,०००/- | १०,५०,०००/- |
| ३. | एमबीए/एमएमएस/एमसीए/पीजीडीएम/पीजी डीबीएम/अभ्यासक्रमाची नवीन पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका महाविद्यालये | १०,५०,०००/- | ९,००,०००/- |
| ४. | पदविका अभ्यासक्रमाची नवीन तंत्रनिकेतने (अभियांत्रिकी) | ९,००,०००/- | ७,५०,०००/- |
| ५. | वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | ७,५०,०००/- | ७,५०,०००/- |
| ६. | संगणक प्रगत अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | ३,००,०००/- | ३,००,०००/- |
| ७. | पदवी/पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अतिरिक्त अभ्यासक्रम | ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | २२,५०,०००/- |
| ८. | पदविका अतिरिक्त अभ्यासक्रम | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ९. | वाढीव प्रवेश क्षमता / पदवी/पदव्युत्तर पदवी (अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकान्वये निर्धारीत एका तुकडीसाठी) | १,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १०. | पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (अंशकालीन) | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | एम.ई./एम.टेक./एम.फार्म/ इत्यादी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १२. | डयूअल पदवी/ इंटिग्रेटेड कोर्सेस | ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १३. | परदेशी संस्था/ परदेशी विद्यापीठ सहयोग | १,००,००,०००/- | १,००,००,०००/- |

२. सदर योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात येत असून सदरहू मुदत ठेव ही १० वर्षापर्यंत बँकेत ठेवण्यात यावी. त्या रकमेचे व्याज संस्थेच्या खात्यात जमा करावे आणि १० वर्षानंतर सदरहू मुदत ठेव संस्थेला परत करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०५२३१५३५२०४००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2efbf911362ce57b361b7f36471cb98eb98ed47e7de8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2017.05.31 12:00:38 +05'30'

**(म. मा. मोरवे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) , महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, विभागीय अधिकारी, इंडस्ट्रियल ॲश्युरंस बिल्डींग, २ रा माळा, चर्चगेट, मुंबई
११. सर्व मा.मंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व मा.राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई
१४. कुलसचिव, एस.एन.डी.टी . महिला विद्यापीठ, मुंबई
१५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
१६. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
१७. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१८. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
१९. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२०. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
२१. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
२२. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
२५. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव
२६. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
२७. निवडनस्ती, तांशि-४.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक:२/एनजीसी/न.प्र.त/२०१८/ ९

दिनांक : 2 JAN 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,

अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :-१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेली जाहिरात क्रमांक अॅप्रुव्हल/१२/(३)/२०१७

२) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/२०१८/८, दि. ०२.०१.२०१८

३) या संचालनालयाने वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक २/ /एनजीसी/ मान्यता/२०१८/१, दि. ०२.०१.२०१८


सहसंचालक, तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, मुंबई ५१.
आवक क्रमांक :
दिनांक :
- 3 JAN 2018


अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/१२(३)/२०१७] एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०१८-१९ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिट्यूशनकरिता मान्यतेला मंजूरी) विनियम, २०१६ व पहिली दुरस्ती, २०१७ नुसार ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०१.०१.२०१८ ते दि. ३१.०१.२०१८ पर्यंत व विद्यमान संस्थासाठी (एपीएच २०१८-१९ च्या तरतूदींनुसार) दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५.०२.२०१८ हा निर्धारीत केला आहे. त्यासअनुसरुन संचालनालय स्तरावरुन संदर्भ क्रमांक २ व ३ च्या जाहिर सूचना प्रसिध्द केल्या असून त्या आपणांस अग्रेषित केलेल्या आहेत. याबाबत आपल्या स्तरावरुन विनाविलंब खालील कार्यवाही करण्यात यावी.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेस अनुसरून संदर्भ क्रमांक २ व ३ च्या अधिसूचनेतील निर्देश आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्थाना आपले स्तरावरुन देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी दि. २३.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये नोंदणी शुल्क निर्धारीत केलेले आहे. त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क जमा करण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावावर शासनाचे अभिप्राय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तूकला परिषदेकडे पाठविण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

३. संदर्भ क्रमांक २ च्या जाहिर सूचनेतील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद अर्ज ज्या संस्थांनी AICTE कडे अर्ज केले असतील अशा संस्थाना सदर प्रस्तावाच्या प्रतीसह आपल्या कार्यालयास संपर्कासाठी सूचित केले आहे. याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने दि. २३.०५.२०१७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्थेने नोंदणी शुल्क/तपासणी शुल्क घेऊन आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी.


सहसंचालक, तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, मुंबई ५१.
आवक क्रमांक : 206
दिनांक :
- 3 JAN 2018

सदर समितीमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी किंवा उपयोजित यंत्रशास्त्र व आर्किटेक्चर विभागातील विभाग प्रमुख/प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश करण्यात यावा व सदर समितीने AICTE च्या मानकाप्रमाणे जमीनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदरहरणार्थ ७/१२ चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँड युज सर्टिफिकेट, ऑक्युपेन्सी सर्टिफिकेट, बांधकाम प्रमाणपत्र, कौन्सील ऑफ आर्किटेक्चरचे रजिस्टर आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेले नकाशे, बांधकामाचे मोजमाप इत्यादी सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करण्यात यावी. त्यानुसार संबंधित जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा AICTE ने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीताच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक / वास्तुकला परिषदेने निर्धारीत केलेल्या विहित केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध असल्याबाबत तपासणी करण्यात यावी. आपलेकडे प्राप्त झालेल्या अर्जांची जसजशी तपासणी होईल त्याप्रमाणे तपासणी समितीचा अहवाल व त्यावर आपले अभिप्रायाची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावरील लिंक वर ऑनलाईन पध्दतीने विभागीय कार्यालयाच Login मधून अपलोड करण्यात यावेत.

४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील संस्थाना आपल्याकडे जमा करण्यास सूचित केले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयात प्राप्त प्रस्तावांना पोच देऊन सदर प्रस्ताव आपल्या स्तरावर जतन करण्यात यावेत.

५. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदने निर्धारीत केलेल्या संबंधित प्रस्तावांबाबते शासनाचे अभिप्राय AICTE कडे पाठविण्याबाबतचा कालावधी अल्प असल्यामुळे प्राप्त होणा-या सर्व प्रस्तावांची शिफारस टप्प्याटप्याने शासनास पाठविण्याचे नियोजित आहे. सबब आपल्या कार्यालयाकडे प्राप्त होणा-या अर्जाच्या अनुषंगाने परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केल्यानूसार आपले स्तरावरुन कार्यवाही झाल्यानंतर संबंधित संस्थेचा प्रस्ताव, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ठ अभिप्रायासह खालील नमूद केलेल्या कालमर्यादेत या कार्यालयास निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावेत.

| अ.क्र. | प्रस्ताव / अर्ज प्राप्त झाल्याचा कालावधी | रकाना क्र.२ मध्ये नमूद प्रस्ताव तपासणी अहवालासह संचालनालयास सादर करावयाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | दि. ०१ ते १० जानेवारी, २०१८ | दि. १२ जानेवारी, २०१८ |
| २ | दि. ११ ते २० जानेवारी, २०१८ | दि. २२ जानेवारी, २०१८ |
| ३ | दि. २१ ते ३१ जानेवारी, २०१८ | दि. ०२ फेबुवारी, २०१८ |

वरील तक्त्यातील रकाना क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास खास दुतामार्फत या संचालनालयास संबधित संस्थेचा अर्ज, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ठ अभिप्रायासह निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावेत अन्यथा AICTE कडे आपल्यामार्फत विहित कालमर्यादेत प्रस्ताव प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव शिफारशी पाठविण्यास उशीर झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे मान्यता प्रक्रीयेचे काम विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकीय वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात व त्यासाठी संबंधित संस्थाप्रमुखांना आपल्या स्तरावर सबंधितांच्या सेवा आवश्यकतेप्रमाणे प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत, सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जाहीर सूचना

क्रमांक: २(३)/एनजीसी/मान्यता/२०१८/ L

दिनांक : 2 JAN 2018

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE ) यांनी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/१२(३)/२०१७] एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०१८-१९ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिट्यूशनकरिता मान्यतेला मंजूरी) विनियम, २०१६ व पहिली दुरस्ती, २०१७ नुसार ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०१.०१.२०१८ ते दि. ३१.०१.२०१८ पर्यंत व विद्यमान संस्थासाठी (एपीएच २०१८-१९ च्या तरतूदींनुसार) दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५.०२.२०१८ हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जांवर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. ३१.०१.२०१८ पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्ताराबाबत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि ०५.०२.२०१८ पर्यंत भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून विद्यापीठांशी / मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲंड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरू करणा-या संस्थानी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE)यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

i. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका स्तरावर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲंड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. हे व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरू करणे.

ii. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.

iii. विद्यमान संस्था बंद करणे.

iv. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.

v. गत शैक्षणिक वर्षातील खंडानंतर मान्यता पुढे चालू ठेवणे / गत शैक्षणिक वर्षात शिखर परिषदेमार्फत थेट कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे.

vi. फार्म डी अभ्यासक्रम नव्याने सुरू करणे

vii. पीजीडीएम कोर्स शिकविणा-या मॅनेजमेंट संस्थाचे रुपांतर एमबीए कोर्समध्ये करणे.

viii. एमसीए / एमबीए अभ्यासक्रम संचलित करणा-या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे.

ix. मॅनेजमेंट मध्ये फेलोशिप प्रोग्राम नव्याने सुरू करणे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, मुंबई ५१
आवक क्रमांक : 
दिनांक : २०५
3 JAN 2018

वरील अर्जाची प्रत संबधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकालगतच्या पुढील दिनांकास किंवा दिनांक ३१.०१.२०१८ यापैकी जे अगोदर असले त्या दिनांकास सहसंचालक, तंत्र

शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. शासनाने दि. २३.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क अदा करणे अनिवार्य असून ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / ना-हरकत प्रमाणपत्र अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे पाठविण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घेण्यात यावी. तसेच वरील प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरात "---------------------" (प्रस्तावाचा विषय) नमूद करावा. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडून वरील अ.क्र. (i) ते (ix) अर्जांच्या अनुषंगाने तपासणी झाल्यानंतर याबाबत संचालनालयाच्या स्तरावर सुनावण्या घेण्यात येणार असून सुनावण्यांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे या संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात येईल.

३. विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी AICTE यांना केलेल्या अर्जाची तपासणी करण्यासाठी या संचालनालयात सुनावण्या घेण्यात येतील. सुनावण्यांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे या संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात येईल.

i. विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरू करणे.
ii. विद्यमान संस्थेतील सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.
iii. विद्यमान संस्थेत अतिरिक्त इंडीग्रेटेड व ड्युअल डिग्री सुरू करणे.
iv. पदविका व पदवी संस्थेत NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणे.
v. द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमाचे रुपांतरण प्रथम पाळीत करणे
vi. पदवी औषधनिर्माणशास्त्र संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरू करणे व याउलट करणे
vii. ओसीआय / पीआयओ/ परदेशी नागरीक/आखाती देशातील भारतीय कर्मचा-यांची मुले यांच्यासाठी नव्याने अधिसंख्या जागा सुरू करणे.
viii. अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी / मुलींसाठी नव्याने जागा ठेवण्यास सुरूवात करणे.

वरील प्रकारच्या अर्जाच्या सुनावणीस येतांना खाली नमूद कागदपत्रांचे २ संच (स्पायलर बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), तसेच AICTE यांचेकडे सादर केलेल्या अर्जातील माहितीच्या पृष्ठर्थची दस्तावेज, सन २०१८-१९ च्या अॅप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीशः उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

i. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा EoA.
ii. सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमांना शासन मान्यता दिल्याचे शासन निर्णय.
iii. संस्थेचा ठराव.
iv. नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी ॲक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची साक्षांकीत प्रत
v. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २३.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत.
vi. प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.
vii. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O Office).
viii. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत.
ix. ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर ॲनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.
x. जमिन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत
xi. एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस २०१८-१९ मधील Appendix १७ मध्ये नमूद केलेले दस्तावेज.

४. विद्यमान संस्थानी AICTE कडे सादर केलेल्या खालील अर्जाच्या अनुषंगाने शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेहेतू या संचालनालयात सुनावणी न घेता प्रकरणपरत्वे शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहेत.

i. महिला संस्थेचे सहशिक्षण (को-एज्युकेशन) संस्थेत परिवर्तन व त्याउलट करणे
ii. अभ्यासक्रमाच्या नांवात बदल करणे
iii. संस्थेच्या नावात बदल करणे
iv. सध्या सुरू असलेले अभ्यासक्रम / शाखा बंद करणे.
v. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे
vi. संलग्न विद्यापीठाच्या / मंडळाचे नावात बदल करणे

वरील प्रस्तावासोबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत, दि. २३.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समावेशनाबाबत तसेच भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, या आशयाचे रु.१००/- चे नोंदणीकृत लेखी प्रतिज्ञापत्र, व एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस २०१८-१९ मधील Appendix १६ व Appendix १७ मधील वरील प्रकरणी नमूद केले दस्तावेज इ. चे २ संच संस्थेच्या पत्रासोबत या संचालनालयास थेट सादर करावीत. येथे असेही नमूद करण्यात येते की, परिपुर्ण नसलेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नसून ते नस्तीबध्द / दप्तरी दाखल करण्यात येतील. तसेच सदर अर्ज परिषदेस सादर केलेल्या दिनांकाच्या लगतच्या पुढील दिनांकास किंवा दिनांक ३१.०१.२०१८ पर्यंत यापैकी जे अगोदर असेल त्या दिनांकास या संचालनालयास सादर करण्यात यावेत.

५. मान्यतेस मुदतवाढीसाठी अर्ज केलेल्या [EoA] विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानीसुध्दा संचालनालयाच्या संकेतस्थळी माहिती भरणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी.

६. विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाना कळविण्यात येते की, त्यांनी AICTE यांना सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे जमा करावी.

७. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीताच्या मान्यतेसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाने http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरती माहिती भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थाच्या अर्जाच्या अनुषंगाने शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र व तद्अनुषंगिक औपचारीक कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थाना काही अडचणी आल्यास त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये अथवा लिंक वर नमूद केलेल्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी दि. २३.०५.२०१७ अन्वये शासनाने निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क संबंधित संस्थाकडून घेण्यात यावे. तसेच परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावाबाबत AICTE ने निर्धारीत केलेल्या मानकांनुसार प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित संस्थानी परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाच्या दिनांकापासून ५ दिवसांचे आत खास दुतामार्फत या संचालनालयास सादर करावेत.

२. सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.

३. सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका स्तरावरील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र/ एच.एम.सी.टी./ एम.सी.ए/ व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या संस्था (संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)